## प्रेसनोट ता.१६/०३/२०१९

## कोंढवा पोलीस ठाणे,पुणे

## घरफोडी चोरी करणा[illegible]या सराईतास जोडीदारांसह केले जेरबंद

कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं.१८७/२०१९ क.४५७,३८० अन्वये दाखल गुन्हयातील तक्रारदार बिलाल अझिझ खान, वय २६ वर्षे, धंदा व्यवसाय,रा.फ्लॅट नं १०१,एस. एस. गॅलेक्सी, पहिला मजला,लेन नं २८,भाग्योदय नगर कोंढवा-खुर्द,पुणे. यांचे घरामध्ये दिनांक २५/०२/२०१९ रोजी रात्रौ १०.०० वाजता ते दिनांक २६/०२/२०१९ रोजी सकाळी ०७.०० वाजणेचे दरम्यान त्यांचे राहते घराचे किचनमधील स्लायडिंगची बंद खिडकी कशाचे तरी साहाय्याने उचकटुन घरात प्रवेश करुन घरातील बेडरुमधील लाकडी कपाटात ठेवलेले वरील वर्णनाचे, माझ्या ताब्यातील व मालकीचे सोन्या – चांदीचे दागिने, मोबाईल फोन असा माल घरफोडी करून चोरून नेला होता.

आज रोजी आम्ही स्वतः पोलीस उपनिरी. शिंदे, पोहवा ५४५६ शेख, पोहवा २५०९ शेख, पोना ३६८८ कुभांर, पोना ११३८ धिवार, पोना ७०२५ कळंबे, पोना ६४५४ पांडुळे, पोशि ८४७५ शेख, पोशि ७७७० मोरे, असे कोंढवा पोलीस ठाणे येथे १७.०० वा. हजर असताना पोशि/८४७५ शेख यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सुमारे १५ ते २० दिवसांपुर्वी भाग्योदय नगर कोंढवा खुर्द पुणे या ठिकाणी घरफोडी चोरी झाली होती. त्यामध्ये चोरीस गेलेला मोबाईल विक्रीकरीता दोन मुले राजश्री मोबाईल शॉपी, भैरवनाथ मंदिर जवळ कोंढवा खुर्द पुणे येथे येणार असुन, त्यापैकी एकाने गोल गळयाचा पांढरा टी शर्ट त्यावर वाघाचा मुखवटा असलेला व काळया रंगाची जिन्स पॅन्ट घातली असुन, दुसऱ्याने गोल गळयाचा टी शर्ट त्यावर इंग्रजीमध्ये वेगवेगळे स्लोगन लिहलेले व काळी रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने लागलीच वरील नमुद स्टापसह आम्ही सर्वजण आमचे खाजगी दुचाकी वाहनावरुन भैरवानाथ मंदिर कोंढवा खुर्द पुणे येथे पोहचलो. भैरवनाथ मंदिर परिसरात नमुद वर्णनातील मुलांचा शोध घेतला असता, बसस्टॉप जवळ मिळालेल्या बातमीतील वर्णनाची मुले उभी असलेली दिसली. तेव्हा आम्हा स्टापची सदरची मुले ही बातमीतील वर्णनाचीच असल्याची खात्री पटल्याने आम्ही सर्वांनी अचानक झडप टाकून दोन्ही मुलांना १७.३० वा. ताब्यात घेवून त्यांना त्यांची नावे व पत्ते विचारता, त्यापैकी पांढरा गोल गळयाचा टी शर्ट घातलेल्या मुलाने त्यांचे नाव नदीम अल्ताफ मेमन, वय- २० वर्षे,रा. लेन नं. २४, किर्ती बी बिल्डींग तळमजला,जिन्या समोरील फ्लॅट, भाग्योदय नगर कोंढवा पुणे व दुसऱ्या मुलाने त्याचे नाव रिजवान नईम मेमन,वय-२० वर्षे, रा. सुंदर विहार फ्लॅट नं.११, मिठानगर कोंढवा खुर्द पुणे असे सांगितले. त्यांचे हातात असलेले दोन मोबाईल हॅन्डसेट कोणाचे आहे.

याबाबत चौकशीकरता ते उडवा-उडवीची व असमाधानकारक उत्तरे देवू लागल्याने त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे सखोल तपास केला असता, दोन्ही मुलांनी मिळून त्यांचा मित्र बिलाल अझिझ खान, वय २६ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. फलॅट नं १०१, एस. एस. गॅलेक्सी, पहिला मजला, लेन नं २८, भाग्योदय नगर कोंढवा खु पुणे. याचे घरी सुमारे १५ ते २० दिवसांपुर्वी रात्री चोरी केली होती, त्यावेळी आम्ही घरातील सोने चांदीचे दागीने व माझेकडील नोकीयाचा  मोबाईल चोरला होता अशी हकिकत सांगितली. तेव्हा नमुद प्रकाराबाबत कोंढवा पोलीस स्टेशन कडील क्राईम रजि. ची पडताळणी करता नमुद ठिकाणाहून रात्री घरफोडी चा गुन्हा कोंढवा पोलीस ठाणे गु.रजि.नंबर १८७/२०१९ क. ४५७,३८०प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्हा आमचेकडे तपासावर असल्याने मुलगा नामे रिजवान नईम मेमन,वय-२० वर्षे, याचे कब्जातील नोकीया कंपनीचा मोबाईल हॅन्डसेटचा आयएमइआय नं. १) ३५६४७७०६६५६६००१ व २)३५६४७७०६६५६६०१९ असा असुन, त्याची आमचेकडे तपासावर असलेल्या गुन्हयातील चोरीस मोबाईल हॅन्डसेटच्या आयएमइआय नंबरशी पडताळणी केली असता, ते आयएमइआय नं. समान एकच असल्याने त्याचे कब्जात असलेला माबाईल हाच गुन्हयात चोरीला गेलेला नोकीया कंपनीचा मोबाईल असल्याचे निष्पन्न झाल्याने व नमुद आरोपींनीच दाखल गुन्हा केल्याचे कबुल केल्याने आरोपी नामे १. नदीम अल्ताफ मेमन, वय- २० वर्षे,रा. लेन नं. २४, किर्ती बी बिल्डींग तळमजला,जिन्या समोरील फ्लॅट, भाग्योदय नगर कोंढवा पुणे व २. रिजवान नईम मेमन,वय-२० वर्षे, रा. सुंदर विहार फ्लॅट नं.११, मिठानगर कोंढवा खुर्द पुणे यांना गुन्हयाचे तपासकामी अटक करून त्यांचेकडून गुन्हयातील चोरीस गेल्या मालापैकी १ नोकीयाचा मोबाईल, सोंन्याचा हार व चांदीचे पैंजण असा एकुण रु.५०४००/- रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. सुनिल फुलारी सो, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, मा. श्री.प्रकाश गायकवाड साो. पोलीस उप आयुक्त परिमंडळ – ५,पुणे शहर, मा. श्री. मिलींद पाटील साो.सहा पोलीस आयुक्त,वानवडी विभाग पुणे शहर, श्री.अनिल पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. महादेव कुंभार पोलीस निरीक्षक,गुन्हे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक चेतन मोरे, पोलीस उपनिरी. सुनिल शिंदे, पोहवा राजस शेख, इकबाल शेख, पोना योगेश कुभांर, सुशिल धिवार, संजिव कळंबे, पृथ्वीराज पांडुळे,निलेश वणवे, जयंत चव्हाण, सुरेंद्र कोळगे, ऊमाकांत स्वामी, अजिम शेख, किरण मोरे, जगदीश पाटील, आदर्श चव्हाण,ऊमेश शेलार यांचे पथकाने केलेली आहे.